सकाळ | eSakal.com
Published on सकाळ (http://www.esakal.com)

# सहसाखळी किडनी प्रत्यारोपण रुग्णांसाठी ठरणार वरदान

- - सकाळ वृत्तसेवा
बुधवार, 26 जून 2013 - 01:15 AM IST

मुंबई - रक्तगट जुळत नसेल तर दोन विभिन्न कुटुंबांतील नातलग "स्वॅप‘ पद्धतीने मूत्रपिंड प्रत्यारोपणासाठी दाता मिळवू शकतात. आता हेच तंत्र अधिक विकसित करून "ऍपेक्स स्वॅप‘ प्रत्यारोपण नोंदणी केंद्राने एकाच वेळी पाच जणांसाठी समूह साखळी मूत्रपिंड प्रत्यारोपणाची किमया साध्य केली आहे. हिरानंदानी, हिंदुजा आणि बॉम्बे हॉस्पिटल यांनी मिळून एकाच वेळी पाच जणांना याच समूह सहमूत्रपिंड प्रत्यारोपण पद्धतीने नवे जीवन दिले.

या पाच जोड्यांमधील चार दाते हे महाराष्ट्रातील असून एक जोडी ही राजस्थानातील होती. यापूर्वी "स्वॅप‘ पद्धतीने करण्यात येणाऱ्या मूत्रपिंड प्रत्यारोपणात रक्तगटाखेरीज अन्य तांत्रिक बाबींमुळे अडसर आला, तर नव्या दात्यांची वाट पाहावी लागत असे. मात्र या समूह साखळी पद्धतीने प्रत्यारोपणाची प्रक्रिया अधिक सुकर आणि जलद होणार आहे.

या प्रक्रियेद्वारे करण्यात येणाऱ्या मूत्रपिंड प्रत्यारोपणास "डॉमिनो‘ प्रत्यारोपण म्हणतात. अवयव प्रत्यारोपणातील ही अत्यंत प्रगत बाब असल्याचे डॉ. जतीन कोठारी यांनी याबाबत माहिती देताना सांगितले. "याआधी "स्वॅप‘ हे केवळ दोन जोड्यांमध्ये केले जात असे; परंतु या नव्या नोंदणी केंद्रामुळे आता रक्तगट, तसेच अन्य वैद्यकीय चाचण्यांचा निकष तपासून पाहून वेगवेगळ्या ठिकाणच्या गरजूंना एकत्रित आणता येणे शक्य होणार आहे.‘ मेंदू मृतावस्थेत असणाऱ्या टप्प्यात अवयवदान व्हावे, यासाठी जनजागृती होत असली, तरीही त्याला अद्याप म्हणावे तसे यश नाही. सहसाखळी प्रत्यारोपणासाठीही डॉ. जतीन कोठारी, डॉ. विश्वनाथ बिल्ला, डॉ. श्रीरंग बिचू यांनी दोन वर्षे अथक प्रयत्न केले आहेत.

उपलब्ध दाते आणि मूत्रपिंडाची गरज असणाऱ्या इच्छुकांच्या सुयोग्य जोड्या जुळविण्याचे काम "ऍस्ट्रा‘मध्ये केले जाते. शस्त्रक्रिया हा त्याचा पुढील टप्पा असून अवघ्या तीन महिन्यांच्या अवधीत दाता मिळवून देण्याचे काम "ऍस्ट्रा‘ करेल, असा विश्वास डॉ. बिचू यांनी व्यक्त केला.

- प्रत्येक वर्षी दोन जोड्यांमधील अदलाबदल प्रक्रियेतून 400 मूत्रपिंड प्रत्यारोपण
- ही प्रत्यारोपणे नातेसंबंधात
- मेंदू मृतावस्थेत असण्याच्या टप्प्यात (कॅडेव्हेअर) मधील 40 प्रत्यारोपण
- मूत्रपिंड निकामी झालेले दहा टक्के रुग्ण हे कुटुंबातील दाता शोधतात.

**ऍपेक्स स्वॅप केंद्र**

- ऍपेक्स केंद्रात ज्यांना मूत्रपिंड प्रत्यारोपण करायचे आहे; मात्र त्यांना दाता मिळत नाही; तसेच ज्यांना मूत्रपिंड दान करायचे आहे त्यांचा रक्तगट कुटुंबातील इच्छुक रुग्णाशी जुळत नाही, अशा दोन्हींना "ऍपेक्स स्वॅप‘ नोंदणी केंद्रात नोंदणी.
- हे नोंदणी केंद्रात प्रत्यक्ष शस्त्रक्रियेशी संबंधित नाही; मात्र इच्छुक आणि दात्यांची वैद्यकीय पार्श्वभूमी तपासून पाहून या दोहोंची प्रत्यारोपणाची प्रमुख गरज भागविण्याचे काम हे केंद्र करणार आहे.
- यात केवळ महाराष्ट्रातीलच रुग्णांचा समावेश नसून देशाच्या कोणत्याही ठिकाणाहून कोणत्याही जाती धर्माचे, वयाचे रुग्ण आणि दाते astra@apexkidneycare.com येथे नोंदणी करू शकतील.
- ही सेवा पूर्णपणे मोफत आहे. त्यासाठी कोणतेही शुल्क नाही.
- वेगवेगळ्या भागांतून रुग्ण आणि दाते यांना एकमेकांपर्यंत पोचविणे, किडनी प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया या

समूह साखळी पद्धतीने रुग्ण जेथे आहेत, त्याच ठिकाणी करता येईल. हा निर्णय संबंधित रुग्णालय, मूत्रपिंडविकारतज्ज्ञ घेतील.
- यामुळे प्रत्यक्ष शस्त्रक्रियांच्या वेळी मूत्रपिंड एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेताना मूत्रपिंड निकामी होण्याची शक्यता टळेल.

© eSakal.com, all rights reserved